# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे - ०४

# महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (MAHATET) - २०२५

## <u>प्रसिध्दीपत्रक</u>

**महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (MAHATET) २०२५** परीक्षेचे आयोजन **दि. २३/११/२०२५** रोजी करण्यात आले होते. या परीक्षेतील पेपर क्र. I (इ. १ ली ते इ. ५ वी स्तर) व पेपर क्र. II (इ. ६ वी ते इ. ८ वी स्तर) चा अंतिम निकाल **दि.०३/०२/२०२६** रोजी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने प्रसिध्द करण्यात आलेला होता.

सदर परीक्षेत पात्र उमेदवारांची पात्रता प्रमाणपत्र त्या - त्या जिल्हयाचे शिक्षणाधिकारी (प्राथ.) जिल्हा परिषद / शिक्षण निरीक्षक मुंबई (प/द/उ) यांचे कार्यालयाकडे देण्यात येत आहे.

तरी शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/शिक्षण निरीक्षक मुंबई (प/द/उ) यांचे कार्यालयात **महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (MAHATET) २०२५** पात्र उमेदवारांच्या प्रमाणपत्राचे वाटप **दिनांक १८/०५/२०२६ ते ०८/०६/२०२६** या कालावधीत केले जाणार आहे तरी पात्रता धारक उमेदवारांनी परीक्षा परिषदेच्या **www.mscepune.in** या वेबसाईट वरील सूचना वाचून आवश्यक त्या मूळ कागदपत्रांसह ज्या जिल्हयात परीक्षा दिली तेथील जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी (प्राथमिक) / शिक्षण निरीक्षक मंबई (प/द/उ) यांचे कार्यालयाशी स्वतः संपर्क साधून आपले प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावेत.

ठिकाण : पुणे

दिनांक : १५ /०५/२०२६

**(अनुराधा ओक)**
**आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे - ०४**

## प्रमाणपत्राचे वितरण खालील सूचना प्रमाणे करावे.

१. उमेदवारांनी खालील कागदपत्रे व प्रमाणपत्रे यांच्या प्रती घेऊन महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा प्रमाणपत्र घेण्यासाठी उपस्थित रहाणे आवश्यक आहे.

**अ)** महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा प्रवेशपत्र प्रत.

**ब)** महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा गुणपत्रिका प्रत.

**क)** डी.टी.एड. उत्तीर्ण गुणपत्रक किंवा प्रमाणपत्र अथवा बी.एड. उत्तीर्ण प्रमाणपत्र किंवा गुणपत्रक

**ड)** आरक्षण प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र.

**इ)** दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र.

**फ)** माजी सैनिक असल्यास त्याबाबतचा पुरावा.

**ग)** ओळखपत्र (आधार कार्ड, पॅनकार्ड, ड्राइव्हिंग लाईसन्स, निवडणूक ओळखपत्र इ.)

२. प्रमाणपत्र वितरणाची पेपर निहाय नोंद वही ठेवावी.

३. महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा दि.२३/११/२०२५ चे पात्रता प्रमाणपत्र संबंधित उमेदवाराला वितरित करताना प्रमाणपत्राच्या मागील पृष्ठावर संबंधित विद्यार्थ्याने शिक्षणाधिकारी (प्राथ.)/शिक्षण निरीक्षक मुंबई (उ/द/प) यांचे समक्ष स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. त्यानुसार स्वाक्षरी घेऊन व संबंधितांच्या प्रमाणपत्राची खात्री करुन शिक्षणाधिकारी (प्राथ.)/शिक्षण निरीक्षक मुंबई (उ/द/प) यांनी प्रमाणपत्र वितरीत करावे.

४. पात्र परीक्षार्थींना शिक्षणाधिकारी प्राथमिक शिक्षण निरीक्षंक मुंबई (उ/द/प) यांचेमार्फत प्रमाणपत्र प्राप्त न झाल्यास शिक्षणाधिकारी प्राथमिक शिक्षण निरीक्षक मुंबई (उ/द/प) यांचेकडे लेखी तक्रार नोंदवावी. अर्जासोबत पुरावा दर्शक कागदपत्रे (गुणपत्रक, प्रमाणपत्र) जोडावेत. शिक्षणाधिकारी प्राथमिक/शिक्षण निरीक्षक मुंबई (उ/द/प) यांनी सदर तक्रारींचा शहनिशा करुन स्व: अभिप्रायासह सदर तक्रारी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडे त्वरीत पाठवाव्यात.

(अनुराधा ओक)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे - ०४.